| | |
|---|---|
| MHWS090008202021 | दाखल दिनांक : २०.०७.२०२१<br>नोंदणी दिनांक : २०.०७.२०२१<br>निकाल दिनांक : ०५.०५.२०२६<br>कालावधी : ०४ व., ०९म., १५ दि. |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र. २), मानोरा यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारीः श्रीमती तृष्णा गो. बन्सोड)

**नियमित फौजदारी खटला क्र. १०२/२०२१** **निशाणी क्र.– ५७**

गुन्हयाचा तपशिल

गुन्हा क्र. : ६८०/२०२०

पोलीस स्टेशन : मानोरा पोलीस स्टेशन, मानोरा.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे– पोलीस ठाणे अधिकारी, मानोरा तालुका पोलीस स्टेशन, मानोरा. |
| अभियोगपक्षातर्फे | विशेष सहा. सरकारी अभियोक्ता– श्री. एम. जी. शर्मा |
| आरोपी पक्ष | ज्योती कैलास भवाळे +३ |
| आरोपी पक्षातर्फे | विद्वान विधीज्ञ श्री. आर. डी. मांडवगडे |

**गुन्हयाचा तपशिल**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | २९/१०/२०२० |
| प्रथम खबर अहवाल तारीख | ३०/१०/२०२० |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २६/०६/२०२१ |
| दोषारोप निश्चित तारीख | ०६/११/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०४/०४/२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | –– |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०५/०५/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | –– |

**आरोपीचा तपशिल**

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हा कलम | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | जेलमध्ये बंद असलेला कालावधी –कलम ४२८ फौ.प्र.सं. प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **ज्योती कैलास भवाळे**<br>वय : २६ वर्ष, धंदाः मजुरी | -- | कलम ४१(१) सी.आर.पी सी. प्रमाणे समजपत्र दिले. | भा.दं.विचे कलम ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष सोडले | -- | -- |
| २. | **पारुबाई दिलीप पत्रे**<br>वय : ४५ वर्ष, धंदाः मजुरी | -- | | | | | |
| ३. | **शिवाजी चंपत पत्रे**<br>वय : ४० वर्ष, धंदाः मजुरी<br>सर्व रा. उमरी बु.,<br>ता. मानोरा, जि.वाशिम. | -- | | | | | |

## न्या य नि र्ण य

(पारित केल्याचा दिनांक ०५/०५/२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ५०४, ५०६ सहकलम ३४ नुसार न्यायप्रविष्ठ आहे.

**सरकार पक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की,**

२. घटना दिनांक २९/१०/२०२० रोजी रात्री ११:०० वाजताचे सुमारास ग्राम–उमरी बु., ता. मानोरा जि. वाशिम येथे घडली. सदर दिवशी फिर्यादी त्यांची पत्नी घरात हजर असतांना आ.क्र.१ ते ३ त्यांच्या घरासमोर आले व त्यांना जोरजोराने आवाज दिला. त्यावेळी फिर्यादी व त्याची पत्नी घराबाहेर आले असता त्यांनी फिर्यादी व त्यांच्या पत्नीला शिवीगाळ केली. फिर्यादीने शिवीगाळ का करता असे विचारले असता आ.क्र.१ हिने तुम्ही माझ्या नवऱ्याला मला मारहाण करायला लावता व एकाचे दोन लावून देता असे म्हटले.

त्यावेळी आ.क्र.३ यांनी फिर्यादी यांना लोखंडी गजाने व आ.क्र.२ व ३ यांनी थापडा–बुक्याने त्यांना मारहाण करुन जखमी केले, शिवीगाळ केली व जीवाने मारण्याची धमकी दिली. त्या अनुषंगाने फिर्यादीने घडलेल्या घटनेबाबत मानोरा पोलिस स्टेशन येथे तक्रार दिली.

३. पोलीसांनी आरोपीं विरुध्द गुन्हा क्र. ६८०/२०२० प्रमाणे भारतीय दंड संहिताचे कलम ३२४, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविला. तपासिक अंमलदार यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे बयाण नोंदविले, वैद्यकिय प्रमाणपत्र हस्तगत केले व तपासाअंती आरोपींविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द भा.दं.वि. चे कलम ३२४, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये नि.क्र.३६ वर दोषारोप निश्चित केले. आरोपींना दोषारोप वाचुन व समजावून सांगितला असता त्यांनी तो अमान्य केला व प्रकरण सुरु ठेवण्याची तयारी दर्शविली. आरोपींची जबानी निशाणी क्र. ३७ व ३९ वर आहे. सरकारपक्षाने आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी केवळ दोनन साक्षीदार, सा.क्र.१ तुकाराम गणाजी भवाळ (फिर्यादी/ जखमी साक्षीदार) यांना नि.क्र.४७ वर व सा.क्र.२ कांता तुकाराम भवाळ (जखमी साक्षीदार) यांना नि.क्र.५० वर तपासले आहे. फिर्यादीतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी पुढे कुठले ही साक्षीदार तपासायचे नसल्याचे कथन केले. त्या अनुषंगाने आदेश नि.क्र.१ वर पारीत करण्यात आला. आरोपींविरुध्द पुरक पुरावा उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे, कलम ३१३(१)(ब) नुसार बयाण नोंदविण्यात आले नाही.

५. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

६. सरकार पक्षाचे हकीकत व आरोपीचा बचाव यावरुन निराकरणासाठी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष, कारणमीमांसासह खालीलप्रमाणे आहेः–

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करते काय की दिनांक २९/१०/२०२० रोजी रात्री ११:०० वाजताचे सुमारास ग्राम-उमरी बु., ता.मानोरा जि.वाशिम येथे आरोपींनी संगणमत करुन फिर्यादी व त्यांचा पत्नीला लोखंडी गजाने व थापडा-बुक्याने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत केली व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| २. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की, उपरोक्त दिनांक वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगणमत करुन फिर्यादी व त्यांच्या पत्नीला शांतता भंग करुण अपमान केला व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ५०४ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ३. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की, उपरोक्त दिनांक वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगणमत करुन फौजदारी स्वरुपाचा धाकदपटशा करुन फिर्यादी व त्यांच्या पत्नीला जीवे मारण्याची धमकी दिली व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ४. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## का र ण मि मां सा

**मुद्दे क्रमांक १ ते ३ बाबतः-**

७. वरील मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने चर्चेकरीता एकत्रीत विचारात घेण्यात येत आहे. सा.क्र.१ या प्रकरणातील मुळ फिर्यादी / जखमी साक्षीदार व सा.क्र.२ महत्वपुर्ण व जखमी साक्षीदार असून त्यांनी कथित घटनेविषयी काहीही सांगितले नाही. त्यांनी घटनेची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. फिर्यादी सा.क्र.१ यांनी पुढे तक्रार देण्याबाबत सांगितले, परंतु

त्यातील मजकूर माहीत नसल्याचे सांगितले. वरील साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचा उलटतपास घेतला. उलटतपासात या साक्षीदाराकडून अभियोगपक्षास अनुकूल अशी कोणतीही बाब अभिलेखावर आली नाही. फिर्यादी साक्षीदाराने त्याचे उलटतपासात आरोपींसोबत न्यायालयाबाहेर आपसी समझोता नि.क्र.४३ व ४४ झाल्याचे मान्य केले. सा.क्र.१ व २ यांनी घटनेच्या दिवशी आरोपींनी कथित मारहाण केल्याचे तसेच शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याबाबत काहीही कथन केले नाही. सदरील बाब त्यांनी स्पष्टपणे नाकारली आहे. म्हणून त्यांच्या पुराव्यावर विश्वास ठेवता येत नाही. गुन्हयाचे घटक सिध्द करण्याइतपत कोणताही पुरक पुरावा अभिलेखावर आला नाही. अभिलेखावरील पुरावा आरोपींवरील आरोप सिध्द करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्ष 'नकारार्थी' देण्यात येत आहे.

<u>**मुद्दा क्रमांक ४ बाबतः–**</u>

८. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, फिर्यादीच्या साक्षेस महत्वपुर्ण जखमी साक्षीदार सा.क्र.२ कांता यांनी पाठींबा दिलेला नाही. अभियोग पक्षास पुरेपुर संधी देवूनही प्रकरणातील इतर महत्वपुर्ण साक्षीदार तसेच वैद्यकिय अधिकारी व तपास अधिकारी यांना पुराव्याकामी हजर करण्यात आलेले नाही. गुन्हयाचे घटक सिध्द करण्याइतपत कोणताही पुरक पुरावा अभिलेखावर आला नाही. अभिलेखावरील पुरावा आरोपीवरील आरोप सिध्द करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे मुद्दे क्र. ४ बाबत खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आ दे श</u>

१. आ.क्र.१ **सौ.ज्योती कैलास भवाळे**, आ.क्र.२ **पारुबाई दिलीप पत्रे** व आ.क्र.३ **शिवाजी चंपत पत्रे** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिताचे कलम ३२४, ५०४, ५०६ सहकलम ३४ अंतर्गत

शिक्षेस पात्र अपराध केल्याचे आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. जप्त मुद्देमाल एक लोखंडी गजाचा तुकडा चा अपिल कालावधीनंतर जाहीर लिलाव करुन आलेली रक्कम नियमाप्रमाणे सरकार जमा करावी.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) च्या पुर्ततेकरीता जमानत दाखल करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by TRUSHNA GOVINDRAO BANSOD
Date: 2026.05.05 18:04:29 +0530

**( तृष्णा गो. बन्सोड)**

दि. ०५/०५/२०२६

न्यायदंडाधिकारी, (प्र.श्रे.)
(न्यायालय क्र.२), मानोरा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | Smt. R. K. Chavhan (L.G.) |
| Court | - | (Smt.T.G. Bansod)<br>Jt. CJJD & JMFC, Manora. |
| Date of Judgment/Order | - | 05/05/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 05/05/2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 05/05/2026 |